दिनांक २९/०८/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

आ.लो.से. श्री. 1) श्री. सचिन बाबुराव विटोरे, वय 35 वर्ष धंदा- नौकरी, पद-भूमापक, नेमणुक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद 2) श्री. किरण काळुबा नागरे, धंदा- नौकरी, पद-भूमापक, नेमणुक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये 60,000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिडको ओरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | 1) श्री. सचिन बाबुराव विटोरे, वय 35 वर्ष धंदा- नौकरी, पद-भूमापक, नेमणुक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद<br>2) श्री. किरण काळुबा नागरे, धंदा- नौकरी, पद-भूमापक, नेमणुक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | प्रथम लाचमागणी 1,50,000/- रुपये, तडजोडी अंती 1,10,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | 60,000/-रुपये |
| तपास अधिकारी | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| सहाय्यक अधिकारी | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचा पिसादेवी गट नं. 100 येथील 5000 स्क्वेअर फुट प्लॉटची मोजणी करण्यासाठी व मोजणी केल्यानंतर मोजणी नकाशाची प्रत देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचा पिसादेवी,औरंगाबाद येथे गट नं. 100 मध्ये 5000 स्क्वेअर फुटाचा प्लॉट असुन सदर प्लॉटची मोजणी करण्यासाठी व मोजणी केल्यानंतर मोजणी नकाशा देण्यासाठी आ.लो.से. नामे १) सचिन विटोरे व आ.लो.से.क्रं. २) किरण नागरे यांनी 1,50,000/- रुपयेची लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.29/08/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्रं. १) सचिन विटोरे व आ.लो.से. क्रं.२) किरण नागरे यांनी फिर्यादी यांना प्रथम लाचमागणी 1,50,000/- रुपये, व तडजोडी अंती 1,10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आजच दि. 29/08/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता आ.लो.से.क्रं. 1) सचिन विटोरे व आ.लो.से.क्रं. 2) किरण नागरे यांनी पहिला हप्ता म्हणुन पडताळणी होण्यापुर्वीच 50,000/- रुपये स्विकारले असुन मोजणी नकाशा देण्यासाठी उर्वरित राहिलेले 60,000/- रुपये पंचासमक्ष आ.लो.से क्रं.02) किरण नागरे यांचे समवेत आ.लो.से. क्रमांक 01) सचिन विटोरे यांनी लाचेची रक्कम जयस्वाल हॉल समोर टि.व्ही.सेंटर रोडवर पंचासमक्ष स्विकारली. लाच स्विकारल्यानंतर नमुद दोन्ही आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे सिडको,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री हनुमंत वारे, सहाय्यक अधिकारी पो.नि. नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार साईनाथ तोडकर, दिगांबर पाठक, अशोक नागरगोजे, पो.अं. विनोद आघाव चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| ई- मेल | :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, |
| पोलीस अधीक्षक | :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994 |
| पोलीस उप अधीक्षक | :- 8668752530 |

पोलीस उप अधिक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद
सत्यमेव जयते

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद.